महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २४

# महाराजा सयाजीराव आणि प्राथमिक शिक्षण

राजश्री कदम



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २४

# महाराजा सयाजीराव आणि प्राथमिक शिक्षण

राजश्री कदम

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि प्राथमिक शिक्षण
इतिहास
राजश्री कदम
●
प्रकाशन क्रमांक - ४४
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : राजश्री कदम
'दत्तकृपा निवास', गर्ल्स हायस्कूल समोर
नवे पारगाव ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर ४१६११३
मो. ८४२११२६५५४
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोघे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ४४ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# प्राथमिक शिक्षण

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे मुख्य साधन आहे. अशी भूमिका घेत महात्मा फुलेंनी भारतीय समाजक्रांतीचा पाया घातला. १८८२ ला त्यांनी हंटर कमिशनसमोर साक्ष देताना सर्वांना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याची मागणी केली. त्यांच्या या आग्रहामागे शिक्षणाशिवाय परिवर्तन होणार नाही आणि ज्या ब्राम्हण जातीच्या ताब्यात हजारो वर्षे शिक्षणाची सूत्रे होती ती बहुजनांना शिक्षण देणार नाही अशी फुलेंची खात्री होती. याच वर्षी सयाजीराव या कामाची सुरुवात आदिवासी आणि अस्पृश्य या समाजातील सर्वात दबलेल्या घटकांपासून करत होते. ही आधुनिक भारताच्या इतिहासातील सगळ्यात मोठी क्रांतिकारक घटना होती.

सयाजीराव वयाच्या १२ वर्षापर्यंत निरक्षर होते. १८७५ ला बडोद्याच्या गादीवर दत्तक गेल्यानंतर वयाच्या बाराव्या वर्षी सयाजीरावांच्या शिक्षणास सुरुवात झाली. त्यानंतर बडोद्याचे तत्कालीन दिवाण टी. माधवराव व त्यांचे शिक्षक एफ.ए.एच. इलियट यांच्या मार्गदर्शनाखाली सहा वर्षे महाराजांनी

राज्यकारभाराचे इत्थंभूत धडे घेतले. सहा वर्षे वैचारिक शिक्षण घेतलेले सयाजीराव १८८१ मध्ये वयाच्या १८ व्या वर्षापासून बडोद्याचा प्रत्यक्ष राज्यकारभार पाहू लागले. मुळातच तल्लख बुद्धीच्या असणाऱ्या सयाजीरावांच्या विचारशक्तीला शिक्षणाने आणखी धार प्राप्त झाली. त्यामुळेच कोणत्याही सामाजिक क्रांतीचे प्रमुख शस्त्र हे शिक्षण आहे हे ओळखून सयाजीरावांनी राज्यकारभार हाती घेतल्यापासूनच आपल्या प्रजेला साक्षर करण्याचा ध्यास घेतला. या ध्यासातूनच महाराजांनी आपल्या ६४ वर्षाच्या यशस्वी कारकीर्दीत शिक्षण प्रसारासाठी अथक परिश्रम घेतले.

## मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठीची पूर्वतयारी

१८८१ मध्ये राज्याधिकार प्राप्तीनंतर सयाजीरावांनी संस्थानच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करून प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर भर दिला. परिणामी १८८१ मध्येच बडोद्यातील १८० प्राथमिक शाळांमध्ये ७,४६५ विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले. १८८२ मध्ये महाराजांनी सोनगढ येथे आदिवासी आणि अस्पृश्यांसाठी पहिली प्रत्येकी एक मोफत निवासी शाळा सुरू केली. यावेळी अस्पृश्यांच्या शाळेत ४० विद्यार्थी शिक्षण घेत होते तर आदिवासींच्या शाळेत ५० विद्यार्थी होते. याचवेळी बडोद्यात आदिवासींची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ११.४% होती. विशेष म्हणजे १८८२ मध्येच इंग्लंडमध्ये सक्तीचे शिक्षण कायदा लागू झाला होता.

१८८३ मध्ये कडी प्रांतात वडनगर आणि बडोदा प्रांतात वास्को येथे महाराजांनी अजून दोन अस्पृश्य शाळा सुरू केल्या. त्यामध्ये एकूण ८२ विद्यार्थी शिकत होते. तर १८८४ मध्ये बडोदा संस्थानात १०० अस्पृश्य विद्यार्थी शिक्षण घेत होते. हे प्रमाण एकूण विद्यार्थ्यांच्या ०.४% होते. हेच प्रमाण १८८५ मध्ये जवळजवळ तिपटीने वाढून १.२% इतके झाले. यावेळी एकूण २८४ विद्यार्थी या शाळांमध्ये शिकत होते.

१८९१ मध्ये बडोद्यात ५५८ प्राथमिक शाळा अस्तित्वात होत्या. याच वर्षी महाराजांनी बडोद्यात अस्पृश्य मुलींसाठी स्वतंत्र शाळा स्थापन केली. या शाळेच्या प्रमुखपदी अस्पृश्य जातीतील महिलेची नियुक्ती करण्यात आली. तर १८९६-९७ या शैक्षणिक वर्षात बडोदा संस्थानकडून अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर १६,००० रुपये खर्च करण्यात आले. राज्यारोहणाच्या १४ वर्षानंतर म्हणजे १८९६ मध्ये सोनगढ येथेच महाराजांनी आदिवासी मुलींसाठी पहिली मोफत निवासी शाळा सुरू केली. महाराजांनी अस्पृश्य-आदिवासींसाठी मोफत शिक्षणासोबतच मोफत वसतिगृहाच्या केलेल्या सोयीचे अनुकरण २६ वर्षांनंतर १९०८ मध्ये राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानातदेखील 'मिस क्लार्क होस्टेल' च्या माध्यमातून केले.

सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाशिवाय शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होणार नाही, असे सयाजीरावांचे निरीक्षण होते. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याच्या उद्देशाने १८९३ मध्ये महाराजांनी अमरेली शहर आणि अमरेली तालुक्यातील ९ गावे अशा एकूण १० गावांमध्ये सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा प्रायोगिक तत्त्वावर लागू केला. सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू करण्याआधी महाराजांनी योग्य ती पूर्वतयारी करण्यावर अधिक भर दिला.

आपले दिवाण मनीभाई जसभाई यांना १६ मार्च १८९३ ला लिहिलेल्या पत्रात सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची पूर्वतयारी करण्यासंदर्भात सूचना करताना सयाजीराव महाराज लिहितात, "सक्तीच्या शिक्षणाची सुरुवात करण्यापूर्वी सर्व ठिकाणी असे शिक्षण देण्याची साधने तयार करून दिली पाहिजेत व ती दिल्यावरही जर लोक आपली मुले शाळेत पाठविणार नाहीत तर मग त्यांना शिक्षा करण्याबद्दलचा विचार पुढे करिता येईल." कोणताही कायदा लागू करण्यापूर्वी जनतेला आवश्यक ती सर्व साधने उपलब्ध करून देतानाच लोकांच्या मानसिक परिवर्तनासाठी वेळ देण्याचा महाराजांचा दृष्टिकोन यातून स्पष्ट होतो. तसेच आज ११५ वर्षानंतर काही अपवाद वगळता भारतातील सरकारी शाळांमध्ये मूलभूत सोयीसुविधांच्या अभावी शिक्षणाचा दर्जा घसरत असताना महाराजांनी दिवाण मनीभाई जसभाई यांना लिहिलेले हे पत्र आजही मार्गदर्शक ठरते.

## मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी

१८९३ मध्ये सुरू केलेल्या या प्रयोगाचे सयाजीरावांनी पुढे १३ वर्षे निरीक्षण केले. या प्रयोगाच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींवर योग्य त्या उपाययोजना केल्या. १३ वर्षांच्या प्रयोगानंतर महाराजांनी १९०६ मध्ये हा कायदा संपूर्ण बडोदा संस्थानात लागू केला. अशा प्रकारचा कायदा लागू करणारे बडोदा हे भारतातील पहिले संस्थान ठरले. तत्कालीन ब्रिटिश भारत आणि ५६५ संस्थानांमध्ये बडोदा वगळता अन्यत्र कोठेही अशा प्रकारचा कायदा अस्तित्वात नव्हता. सयाजीरावांचा हा कायदा लागू करण्याचा निर्णय क्रांतिकारक होता. सयाजीरावांच्या या निर्णयाचे महत्त्व सांगताना विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात, "...याच सुमारास श्रीमंत महाराजांनीही आपल्या राज्यात सक्तीच्या शिक्षणाचा कायदा पास करून राष्ट्रीय शिक्षणाचा धडा इतर लहान मोठ्या संस्थांनासच नव्हे तर प्रत्यक्ष इंग्रज सरकारासही घालून दिला. बडोद्याच्या इतिहासात हे साल सोन्याच्या अक्षरात लिहिले जाईल." सयाजीराव केवळ कायदा करून थांबले नाहीत. कायदा लागू केल्यानंतर महाराज सातत्याने त्याची चिकित्सा करत राहिले. त्यासाठीच त्यांनी १९१६ मध्ये एका समितीची देखील नेमणूक केली. यातूनच महाराजांचा आपल्या जनतेला सर्वोत्तम शिक्षण देण्याचा ध्यास लक्षात येतो.

**मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्यातील प्रमुख तरतुदी :**

१) हा कायदा संपूर्ण संस्थानात लागू करण्यात आला होता, परंतु कलम २ नुसार महाराज अधिकृत राजपत्रात सूचना देऊन एखाद्या समुदायाला किंवा भागाला या कायद्याच्या अंमलबजावणीतून वगळू शकतात.

२) कलम ४ (ख) प्रमाणे सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठीची वयोमर्यादा निश्चित असून ती मुले व मुली दोघांसाठीही ७ ते १२ वर्षे अशी आहे.

३) कलम ५ नुसार, निश्चित केलेल्या वयोमर्यादेतील प्रत्येक बालकाच्या पालकांना, बालकाला शाळेत पाठवणे वैधानिकरीत्या बंधनकारक आहे.

४) कलम ६ नुसार फक्त काही अपवादात्मक परिस्थितीत बालकांना शाळेत गैरहजर राहण्याची सूट मिळते. उदा.

I) बालक घरीच समाधानकारकपणे शिक्षण घेत असेल.

II) ज्यांनी पाचवी किंवा समकक्ष इयत्ता उत्तीर्ण केली असेल.

III) कायमस्वरूपी शारीरिक किंवा मानसिक अपंगत्वामुळे बालक शाळेत जाण्याच्या स्थितीत नसेल.

IV) बालकाला स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी काम करावे लागत असेल किंवा अपंग आणि वृद्ध आजारी पालकांची देखभाल करणे गरजेचे असेल किंवा आई-वडिलांना कामासाठी बाहेर पडणे आवश्यक असल्याने लहान भावंडांची देखभाल करणे गरजेचे असेल.

V) बालकाच्या घरापासून एक मैलाच्या परिघात शाळा नसेल.

५) या कायद्यातील कलम ९ व १० नुसार वार्षिक परीक्षांच्या एक महिना अगोदर महसूल अधिकाऱ्यांच्या मदतीने शिक्षक शाळेत जाण्यायोग्य वयाच्या मुलांची गणना करून या गणनेची यादी प्रसिद्ध केली जात असे. ही यादी प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ज्या पालकांना या यादीला आव्हान द्यायचे असेल किंवा आपल्या पाल्यासाठी सूट मागून घ्यायची असेल त्यांनी यासंदर्भात नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांकडे अर्ज करणे गरजेचे असते, याबाबतीत या अधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय अंतिम असे.

६) कलम ११ अन्वये या गणनेच्या यादीत नाव असलेल्या तसेच कोणत्याही प्रकारची सूट न मिळालेल्या किंवा ज्या पालकांनी अधिकाऱ्यांकडे अर्ज केला असेल आणि अधिकाऱ्यांकडून नकार मिळाला असेल तर, त्या मुलांच्या पालकांनी ही यादी प्रसिद्ध झाल्यानंतर तीस दिवसांच्या आत बालकाला शाळेत पाठवणे बंधनकारक आहे.

७) कलम १२ नुसार या गणनेच्या यादीत नाव असलेल्या परंतु शाळेत प्रवेश न घेतलेल्या मुलांच्या माहितीचा मासिक अहवाल शाळांच्या मुख्याध्यापकांनी सरकारकडे पाठवणे बंधनकारक असे.

८) कलम १३ प्रमाणे मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेल्या अहवालातील मुलांच्या राहण्याचे ठिकाण जर खेडे असेल तर पंचायत, शहर असेल तर नगरपालिका आणि बडोदा शहरच असेल तर मामलतदार यांच्याकडून त्या मुलांच्या पालकांना नोटिस पाठविली जात असे. अशा मुलांच्या पालकांवर खटला चालविला जात असे. या खटल्यादरम्यान पालकांना आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाई आणि जर पालक दोषी आढळल्यास पहिल्या वेळी आठ आण्याचा, दुसऱ्या वेळी एक रुपयाचा आणि नंतरच्या प्रत्येक वेळी आधीच्या दंडापेक्षा दोन आणे जास्त दंड आकारला जात असे. या दंडाची रक्कम जास्तीत जास्त दहा रुपयांपर्यंत वाढवली जाऊ शकत होती. संबंधित बालक शाळेला जाईपर्यंत दर महिन्याला हा दंड घेण्यात येत असे.

९) शाळेत प्रवेश घेतलेल्या मुलांना विशिष्ट कारणासाठीच रजा घेण्याची परवानगी होती. सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्यातील कलम १४ नुसार विद्यार्थी स्वतः आजारी असेल किंवा कुटुंबातील व्यक्ती आजारी असेल किंवा पालकांना व्यवसायात मदत करायची असेल, तर त्या विद्यार्थ्याला रजा मिळू शकत होती. मात्र याअगोदर त्या विद्यार्थ्याने १५ दिवसांच्या वर सलग रजा घेतलेली नसावी आणि वर्षभरात त्याच्या रजेच्या दिवसांची संख्या ३० दिवसांच्या वर जाऊ नये, अशी अट या कायद्यात घालण्यात आली आहे.

१०) कलम १५ प्रमाणे हा रजेचा भाग वगळून प्रत्येक विद्यार्थी महिन्याच्या एकूण शाळेच्या दिवसांपैकी दोन तृतीयांश दिवस शाळेत उपस्थित असणे आवश्यक आहे. ही किमान उपस्थिती राखू न शकणाऱ्या विद्यार्थांचे अहवाल शाळेच्या मुख्याध्यापकांनी दर महिन्याला सरकारला पाठवणे अनिवार्य आहे.

११) कलम १६ नुसार मुख्याध्यापकांचा हा अहवाल प्राप्त झाला की कलम १३ मध्ये उल्लेख केलेले अधिकारी, पालकांना दंड करण्याची तीच पद्धत त्याच प्रकारे सुरू करतात. परंतु यावेळी दंडाची कमाल मर्यादा पाच रुपये इतकी आहे.

१२) या कायद्यातील कलम १८ नुसार पालकांना आकारलेली ही दंडाची रक्कम १५ दिवसांच्या आत भरणे आवश्यक होते. असे न केल्यास संबंधित पालकांच्या जमीन महसुलातून ही रक्कम वसूल केली जात असे.

१३) कलम १९ अन्वये या कायद्यातील कलम १३ व कलम १६ नुसार झालेल्या दंडाला पालकांना आव्हान देता येत नव्हते. मात्र ते उच्चत्तर अधिकाऱ्यांकडे पुनर्विचार याचिका दाखल करू शकत होते.

१४) कलम २० नुसार मुलांना कामावर ठेवणाऱ्या लोकांनाही कलम १३ आणि कलम १६ चे दंड लागू होते.

१५) कलम २३ प्रमाणे तपासणी अधिकाऱ्यांनी विद्यार्थांच्या गणनेचा अभ्यास करून ती अचूक आहे का हे तपासणे, अपवादानुसार सूट दिली असल्यास ती योग्य आहे का नाही

हे पाहणे, दंड योग्य प्रकारे दिले आहेत का नाही, तसेच त्यांची वसुली योग्य वेळात होत आहे का नाही या बाबी तपासणे अनिवार्य आहे.

१६) सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्यातील कलम २४ नुसार पालकांकडून वसूल न होणारा दंड माफ करण्याचे अधिकार मामलतदारांना आहेत.

१७) कलम २६ नुसार दंड वसुलीतून मिळालेली रक्कम ही केवळ शैक्षणिक कार्यासाठीच वापरण्यात येत असे. एकूण रकमेतील ६५ टक्के रक्कम शाळांच्या इमारतींसाठी आणि ३५ टक्के रक्कम गरीब विद्यार्थ्यांना पुस्तके पुरवण्यासाठी व त्यांना मदत करण्यासाठी खर्च केली जात असे.

## कायद्याची ऐतिहासिकता

महाराजांनी या कायद्यात केलेल्या या विविध तरतुदी समजून घेणे गरजेचे आहे. बडोद्यातील या कायद्यानुसार निर्धारित वयापेक्षा अधिक वय असणाऱ्या व सामाजिक आणि मानसिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या विद्यार्थ्यांना या कायद्यातून सूट देण्यात आली होती. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे पालक शारीरिकदृष्ट्या दुर्बल आहेत अशा विद्यार्थ्यांनासुद्धा सूट देण्यात आली. शाळेपासून एक मैलांपेक्षा जास्त अंतरावर राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळेतील उपस्थितीचे बंधन शिथिल करण्यात आले होते. तसेच ज्या विद्यार्थ्यांवर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी आहे अशा विद्यार्थ्यांना देखील या कायद्यात सूट

देण्यात आली होती. कोणत्याही कायद्याची अंमलबजावणी करताना सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन आयुष्याचा इतका बारकाईने विचार करण्याची सयाजीराव महाराजांची दृष्टी त्यांच्यातील संवेदनशील राजाचा परिचय करून देते.

सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षण कायद्यात सुरुवातीला शाळेत प्रवेश घेण्याचे वय मुलांसाठी सात ते बारा वर्ष तर मुलींसाठी सात ते दहा वर्ष असे निर्धारित केले होते. बालविवाह प्रतिबंधक कायद्यामुळे पालक १२ वर्षाखालील मुलींचे लग्न लावून देऊ शकत नव्हते. त्यामुळे सयाजीरावांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्यात १९१३ मध्ये सुधारणा करून शाळेत प्रवेश घेण्याचे वय मुलींसाठी १२ वर्ष तर मुलांसाठी १४ वर्ष केले. तसेच सक्तीच्या शिक्षणाची मर्यादा पाचवीपर्यंत करण्यात आली. १९०६ च्या या कायद्यानुसार जर एखादा विद्यार्थी महिन्याच्या शैक्षणिक कामाच्या एकूण दिवसांपैकी दोन तृतीयांश दिवस गैरहजर असेल तर त्याला शिक्षेस पात्र ठरविण्यात येई. अशा वेळी विद्यार्थ्यांच्या पालकांकडून प्रतिदिन एक रुपया याप्रमाणे दंड आकारण्यात येत असे. ही दंडाची रक्कम शाळेच्या इमारती बांधण्यासाठी आणि गरजू मुलांना मदत देण्यासाठी वापरण्यात येई. अशा प्रकारचा दंड आकारणारे बडोदा हे जगातील पहिलेच राज्य ठरते.

**सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्याच्या अंमलबजावणीतील**

## अडचणी

१) या कायद्यातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे शाळेला जाण्यायोग्य वयाच्या मुलांची गणना करणे. सुरुवातीला हे काम शिक्षकांना महसूल अधिकाऱ्यांच्या (पटेल) मदतीने करण्यास सांगितले जाई; पण या पद्धतीत अनेक अडचणी येऊ लागल्या. आपल्यापेक्षा वरच्या पदावरील पटेलांकडून मदत मागणे किंवा मदत न मिळाल्यास त्यांची तक्रार करणे शिक्षकांना शक्य नव्हते. त्यामुळे या कायद्यात सुधारणा करण्यात आली आणि शाळेत जाण्यायोग्य वयाच्या मुलांच्या गणनेची जबाबदारी शिक्षकांऐवजी गावच्या पटेलावर सोपवण्यात आली, गावातल्या शिक्षकांनी त्यांना या कामात मदत करण्यास सांगितले. हा बदल केल्यानंतर या कामाची स्थिती आणि गती बरीच सुधारली.

२) विद्यार्थ्यांची गणना करताना मुलांची माहिती मिळवण्याच्या तुलनेत मुलींची माहिती मिळविणे खूपच अवघड असे. विशेषतः पडदा पद्धत पाळणाऱ्या राजपूत आणि मुस्लिम समुदायातील पालक आपल्या मुलींना शाळेत पाठवायला लागू नये म्हणून आपल्या मुलींची माहिती अधिकाऱ्यांना देत नसत.

३) विद्यार्थ्यांच्या गणनेचे काम जितक्या गांभीर्याने व्हायला हवे तितक्या गांभीर्याने पटेल लोक करत नसत. शिक्षण विभागातील अधिकारी याबाबत तक्रार करताना म्हणतात,

‘महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना ही गणना म्हणजे एक दुय्यम प्रकारचे, बाजूचे काम वाटते. त्यामुळे शिक्षण अनिवार्य करण्याच्या या कामात त्यांची मनापासून मदत होतच नाही.’

४) बऱ्याचदा खेड्यातील लोक या गणनेच्या कामात अधिकाऱ्यांना मदत करण्यास हात आखडता घेत असत. आपल्या मुलांनी घरातील किंवा शेतातील कामास हातभार लावावा, अशी पालकांची इच्छा असते आणि त्यामुळे ते आपल्या घरातील मुलांची नावे शक्य असेल तोपर्यंत या गणना यादीपासून दूरच ठेवायचा प्रयत्न करतात. विशेषतः मागास समुदायामध्ये ही गोष्ट जास्त प्रमाणात आढळून येते.

५) सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्यांतर्गत सक्तीच्या वयोगटातील विद्यार्थांची गणना करण्याचे काम महसूल अधिकाऱ्यांवर सोपविले होते परंतु हे अधिकारी विद्यार्थी नोंदणीचे काम गांभीर्याने करत नसत. अनेक वेळा गावातील पटेल लोक ही यादी व्यवस्थित करत नसत किंवा बऱ्याचदा त्यांना अशी यादी करण्याची इच्छाच नसे. कारण व्यवस्थित यादी केल्यास गावातील अनेक लोक दंडास पात्र ठरतील व त्यातून गावच्या लोकांची आपल्यावर नाराजी वाढेल. या भीतीपोटी अधिकारी ही यादी अपूर्ण ठेवत असत.

६) या कायद्यांतर्गत अपवादात्मक परिस्थितीत पालकांना आपल्या मुलांना शाळेत न पाठवण्याची सूट मिळत असे. परंतु अनेकांकडून या सवलतीचा गैरफायदा घेतला जात असे. पालक

विविध कारणे सांगून आपल्या मुलींना शाळेत न पाठवण्याची सवलत मिळवत असत. या कायद्यातून सूट मिळवण्यासाठी येणाऱ्या अर्जाच्या संख्येत मुलींची सूट मागणारे अर्ज दुप्पट प्रमाणात असे.

७) ज्या मुलांनी शाळेत प्रवेश घेतलेला नाही किंवा ज्यांची शाळेतील उपस्थिती कमी आहे, अशा मुलांच्या पालकांवर कारवाई करण्यात येत असे. शाळेत प्रवेश न घेतलेल्या किंवा नेहमी अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी शाळेचे मुख्याध्यापक दर महिन्याला पाठवत आणि पंचायत, नगर परिषद किंवा वहिवाटदार अशा पालकांना दंड करत असे. परंतु या व्यवस्थेतील एक अडचण म्हणजे आकारण्यात आलेले दंड प्रत्यक्षात फार कमी वेळा वसूल होत, किंबहुना होतही नसत. आधीचेच दंड चुकवलेल्या पालकांना पुन्हा पुन्हा दंड आकारल्याने दंडाची रक्कम वाढून ती भरणे पालकांना शक्य होत नसे. दंड वसूल करण्यात येणाऱ्या अडचणींमुळे या दंडाच्या रकमेचा लोकांवर फारसा परिणाम होत नसे.

## शिक्षण अधिकाऱ्यांनी नमूद केलेल्या इतर काही अडचणी

१) बडोदा विभागाचे शिक्षण अधिकारी -"मागासवर्गीय मुले पाचव्या वर्गापर्यंत पोहोचतच नाहीत. शाळा बुडवल्याच्या कारणाने होणारे दंड वेगवेगळी कारणे देऊन चुकवण्यातच त्यांचा फार काळ जातो आणि त्यात सक्तीचे शिक्षणाचे वय उलटून गेले की, मग अशी मुले शाळेकडे फिरकतच नाहीत."

२) पाटण विभागाचे शिक्षण अधिकारी - "मागासवर्गीय मुलांचे शिक्षणातील शेकडा प्रमाण अतिशय कमी असण्यामागे त्यांच्या पालकांची अतिशय हलाखीची आर्थिक परिस्थिती हे कारण असते. गरिबीच्या रेट्यामुळे असे पालक आपल्या मुलांनाही आपल्या मदतीला घेऊन उदरनिर्वाहाचे काम करतात. भले मग त्या मुलांची शाळा बुडून दंड झाला तरी त्याचे त्यांना काही वाटत नाही. याशिवाय अंत्यज मुलांच्या बाबतीतील अजून एक अडचण म्हणजे जेथे शाळा खासगी इमारतीत किंवा देवळात भरतात, तेथे या अंत्यज मुलांनी शाळेत येण्याला उच्चवर्गीयांचा विरोध असतो."

३) कडी विभागाचे शिक्षण अधिकारी – "एका खेड्यात रस्ते झाडणे इत्यादी काही कामांसाठी उच्चवर्णीय हिंदू लोक हरिजनांना भाकरी देत, अशी पद्धत होती. उच्चवर्णीयांकडून अशी मिळणारी भाकरी हेच या हरिजनांना मिळू शकणारे अन्न असे. जेव्हा शिक्षण सक्तीच्या करण्यात आले तेव्हा हे हरिजन आपल्या मुलांना शाळेत पाठवू लागले. हे पसंत न पडून उच्चवर्णीयांनी अधिकाऱ्यांकडे विरोध दर्शवायला सुरुवात केली. मात्र, हे अधिकारी ठाम राहिल्यावर या उच्चवर्णीय हिंदूंनी हरिजनांची रोजची भाकरी बंद केली. उपासमारीची वेळ आल्यावर त्या हरिजनांनी मुकाट्याने आपली मुले शाळेतून काढून घेतली. रोजची भाकरी गमावण्यापेक्षा शाळा बुडवण्याचा दंड कधीतरी भरायचा त्यांनी पत्करले. सक्तीचे शिक्षणासाठीच्या

वयोमर्यादेतल्या मागासवर्गीय मुलांची गणना करणे अत्यंत अवघड आहे. या वास्तवामुळे एकूणच शाळा प्रवेशांच्या बाबतीत मत दूषित होते.”

४) नवसारी विभागाचे शिक्षण अधिकारी – “या विभागाचा एक विशेष म्हणजे इथली लोकसंख्या उच्चवर्णीयांत आणि मागासवर्गात विभागली गेली आहे. दोन्ही वर्गांची संख्या मोठी आहे. मागासवर्गीय समाज शिक्षणाची सक्ती असूनही निरक्षरच आहे. साक्षर होण्याला त्यांच्या दृष्टीने काही मूल्य दिसत नाही. या मागासवर्गीयांना शिक्षण मिळू नये आणि यापूर्वी पिढ्यान्‌पिढ्या ते जसे आपल्या वर्चस्वाखाली राहिले; तसेच पुढेही राहावेत, यासाठी उच्चवर्णीय लोक खूपच दक्ष आहेत. त्यामुळे बहुतेक वेळा शाळा बुडवण्याबाबतचा दंड या गरीब लोकांनाच होतो आणि त्यांचे उच्चवर्णीय संबंधित लोक त्यांचे हे दंड भरून टाकायलाही मागेपुढे पाहत नाहीत.”

५) पेटलाद विभागाचे शिक्षण अधिकारी –“शेती कामांच्या महिन्यात म्हणजे जुलै, ऑगस्टमध्ये शाळेतील उपस्थिती कमी असते, असे आम्हाला दिसून आले. मे आणि जून महिन्यांतील लग्नसराईच्या वेळीही कधी कधी उपस्थिती खाली जाते. खेड्यांतील शाळांमधील मुलांची उपस्थिती ही त्या त्या ठिकाणच्या शेतीच्या स्थितीवर अवलंबून असते.”

या अडचणींवर मात करण्यासाठी सयाजीरावांनी अनेक उपाययोजना केल्या. गैरहजेरीच्या बाबतीत काटेकोर नियम

करणाऱ्या महाराजांनी शेतकऱ्यांच्या मुलांना विशेष सवलत दिली. या सवलतीनुसार एका सत्रात ४५ दिवसांपेक्षा जास्त दिवस गैरहजर नसलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना सुगीच्या दिवसात शेतातील कामाचा भार अधिक असल्यास गैरहजर राहण्याची कायदेशीर परवानगी देण्यात आली. यावरून सयाजीरावांच्या मनातील जनसामान्यांच्या कर्तव्याप्रीत्यर्थ असणारा आदरभाव लक्षात येतो. सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू करतानाच सयाजीराव महाराजांनी ज्या लोकांमध्ये पडदा पद्धतीची प्रथा आहे त्यांच्यावर आपल्या मुली शाळेत पाठविण्याची जबरदस्ती न करण्याची सूचना आपल्या अधिकाऱ्यांना केली. परंतु ही सूट देतानाच शाळेतील अभ्यासक्रमाप्रमाणे मुलींना घरीच शिक्षण देण्याची जबाबदारी मुलींच्या घरच्यांवर सोपवण्यात आली.

येथे विशेष नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे सयाजीरावांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्यांतर्गत आकारण्यात येणारी दंडाची रक्कम अनेक वेळा माफ केली. १९३६ ला सयाजीरावांच्या पंच्याहत्तरीनिमित्त सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्यांतर्गत मुलांच्या पालकांचे १९३२ पर्यंतचे थकलेले दंड माफ करण्यात आले. १९३४ ते १९३८ या पाच वर्षात मुलांच्या पालकांना आकारलेल्या दंडाची एकूण रक्कम १८,७०,२९६ रु. होती. त्यापैकी २,१८,१३५ रु. रक्कम पालकांकडून वसूल झाली तर ६,१९,२९५ रु. इतकी दंडाची रक्कम सयाजीरावांनी

पालकांना माफ केली. वसूल झालेल्या रकमेपेक्षा चार पट अधिक रक्कम सयाजीरावांनी माफ केली. सयाजीराव समाज सुधारणेसाठी कायद्यांच्या माध्यमातून कडक निर्बंध लावतानाच प्रजेवर त्याचे ओझे होणार नाही याची विशेष काळजी घ्यायचे.

## पूरक हितकारक कायदे आणि सुविधा

आर्थिक अडचणींमुळे काही मुले अल्प वयातच कारखान्यांत काम करायला जात असत किंवा काही वेळा त्यांच्याकडून जबरदस्तीने काम करून घेतले जाई. या मुलांचे बालपण सुरक्षित करण्यासाठी १९१०-११ ला कायदेमंडळात फॅक्टरी बिल मांडण्यात आले. त्यानुसार शाळेत जाण्याच्या वयातील मुलांना अल्पशा मजुरीवर कारखाने आणि मिलमध्ये काम करण्यास बंदी घालण्यात आली. याचवर्षी 'चिल्ड्रन कोर्ट ॲक्ट' संमत करण्यात आला. त्यानुसार बालगुन्हेगारांना सुधारण्याची जबाबदारी शिक्षण विभागावर सोपविण्यात आली. सयाजीरावांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडेही विशेष लक्ष दिले. विविध साथीच्या रोगांपासून बालकांना सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी स्वच्छता आयुक्त आणि 'चिमणाबाई मॅटर्निटी ॲण्ड चाईल्ड वेलफेअर लीग' या संस्थेच्या वतीने संस्थानातील बालकांची वैद्यकीय तपासणी केली जात होती. विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय तपासणीची सुरुवात १ जानेवारी १९२३ पासून करण्यात आली. त्यासाठी एक तपासणी कार्डही विकसित करण्यात आले.

## शाळा तपासणी यंत्रणा

शिक्षण विभागाचे काम योग्य रीतीने होत आहे का याची तपासणी करण्यासाठी व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सयाजीरावांनी या विभागाची तपासणी करणारी एक यंत्रणा उभारली. त्यासाठी महाराजांनी विविध पदे निर्माण केली. सयाजीरावांनी शिक्षण निरीक्षक पदासोबतच शिक्षण उपनिरीक्षक पद निर्माण केले. त्याचबरोबर उर्दू शाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उर्दू पर्यवेक्षक तर संस्कृत शाळांसाठी संस्कृत पर्यवेक्षक ही स्वतंत्र पदे निर्माण करण्यात आली. या सगळ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सहायक संचालक आणि संचालक नेमण्यात आले. तसेच १८९५-९६ मध्ये 'संचालक, देशी भाषा शिक्षण' हे पद 'विद्याधिकारी' असे करण्यात आले होते. अशी विविध पदे निर्माण करताना सयाजीरावांनी या पदावरील व्यक्तीला अधिकचे काम लागू नये याची काळजी घेतली. कोणत्याही पर्यवेक्षकाला ६० पेक्षा अधिक शाळांचे पर्यवेक्षण करावे लागू नये अशी तरतूद करण्यात आली.

## मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा नियमित आढावा

बडोद्यात ठरावीक कालावधीनंतर, नियमितपणे प्राथमिक शिक्षणासंबंधित बाबींचा आढावा घेतला जात होता. प्राथमिक शिक्षणातील प्रगती जाणून घेणे, शिक्षण प्रणालीत येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षण

मंडळाला विविध सुधारणात्मक सूचना करणे इ. गोष्टींचा या आढाव्यात समावेश होता.

बडोदा संस्थानातील शैक्षणिक परिस्थितीच्या या आढाव्यात खालील मुद्द्यांबाबत माहिती घेण्यात येत असे :

१) शाळेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या याद्या परिपूर्ण आहेत का?

२) शाळेत उपस्थित न राहण्याची विद्यार्थ्यांची काय कारणे आहेत?

३) विद्यार्थ्यांना काही बाबतीत देण्यात येणारी सूट कोणत्या आधारावर मागितली आणि दिली जात आहे.

४) प्राथमिक वर्गाच्या तुकड्यांमधील विद्यार्थी संख्या आणि हे चारही वर्ग पूर्ण करण्याआधी शाळा सोडण्यामागील विद्यार्थ्यांची कारणे.

५) प्राथमिक शिक्षण सक्तीचे केल्यानंतर खेड्यांमधील साक्षरतेच्या प्रमाणात झालेली वाढ.

६) या शाळा सर्वसामान्य स्थितीत कशा चालतात, हे पाहणे.

७) सक्तीचे शिक्षण घेतलेले विद्यार्थी खरोखरच साक्षर झाले आहेत ना, नसल्यास किती प्रमाणात हे पाहणे.

८) ही शिक्षण पद्धत पालकांना कितपत आवडत आहे; तसेच या पद्धतीत काही सुधारणात्मक बदल करण्याची गरज आहे का, हे पाहणे.

१९०६ मध्ये संपूर्ण संस्थानात सक्तीचे शिक्षण केल्यानंतर १९०९ ला एका आयोगाची स्थापना करण्यात आली. सक्तीचे प्राथमिक शिक्षण या मुद्द्याचा सर्वांगीण अभ्यास करून त्याचा अहवाल सादर करणे हे या आयोगाचे काम होते. या आयोगाच्या शिफारशीनुसार १९१०-११ साली सक्तीच्या शिक्षणाची वयोमर्यादा वाढवून मुलांसाठी १२ वर्षे आणि मुलींसाठी ११ वर्षे करण्यात आली. १९१६ मध्ये याच धर्तीवर दुसरा आयोग आणि त्यानंतर १९२६ मध्ये तिसरा आयोग स्थापन करण्यात आला. तर १९२७ ला प्रत्येक शिक्षण उपनिरीक्षकाने दरवर्षी आपल्या विभागातील एका खेड्याची दक्षतापूर्वक तपासणी करण्याचे आदेश दिले. या प्रत्येक समितीच्या अहवालाचा महाराज स्वत: अभ्यास करून शिक्षण प्रणालीत योग्य बदल करत.

१९३३ मध्ये राज्यातील शिक्षण व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारचे माजी शिक्षण आयुक्त श्री. आर. लिटलहेल्स यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी बडोद्याच्या संपूर्ण शिक्षण प्रणालीची पाहणी करून त्यावर आवश्यक त्या सूचना करण्याची विनंती केली. त्यांनी बडोद्यातील आणि राज्याच्या इतर भागातील शिक्षणसंस्थांना भेट देऊन त्यांच्या कामकाजाचा अभ्यास केला. या पाहणीच्या आधारे त्यांनी एक अहवाल तयार करून तो बडोदा सरकारला सादर केला. श्री. आर. लिटलहेल्स यांनी अहवालात केलेल्या शिफारशी पुढीलप्रमाणे :

१) शिक्षणाची अनिवार्य वयोमर्यादा १४ वरून १२ वर आणावी.

२) राज्यातील सर्व शाळांमध्ये किंडरगार्टन आणि मॉन्टेसरी पद्धत सुरू करावी.

३) हस्तकला प्रशिक्षण प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधून देण्यात यावे. हात आणि डोळे यावर या प्रशिक्षणात अधिक भर देण्यात यावा.

४) शिक्षण समितीच्या सल्ल्याने प्राथमिक शाळांतील सुट्ट्या निश्चित करण्यात याव्यात.

५) प्राथमिक शाळांतील पहिल्या तीन वर्गांचे मूल्यमापन स्थानिक ज्येष्ठ प्रशिक्षित शिक्षकाकडून करून घेण्यात यावे. त्यामुळे उपनिरीक्षकांवरील कामाचा भार हलका होईल आणि त्यांना जास्तीत जास्त शाळांना भेटी देणे शक्य होईल.

६) देशीभाषा माध्यमाच्या शाळांमध्ये अधिकच्या तुकड्या वाढविण्याचा विचार व्हावा. त्या इंग्रजी विषयासह किंवा इंग्रजी विषयाशिवायही असू शकतील.

१९४१ पासून एक नवीन उपक्रम संस्थानने हाती घेतला. प्राथमिक शिक्षणासंदर्भातील सखोल तपासणी करण्यासाठी दहा वर्षांपूर्वी जी खेडी निवडली होती तीच खेडी पुन्हा निवडली आणि या नवीन तपासणीतून समोर आलेल्या निष्कर्षांची दहा वर्षांपूर्वीच्या निष्कर्षांशी तुलना केली. त्यामुळे १९४१ मधील वार्षिक अहवालातून मिळालेली माहिती अधिक सुधारणा

करण्यासाठी उपयुक्त ठरली. सक्तीची शिक्षण प्रणाली प्रत्यक्षात कशी कार्यरत आहे, हे पाहण्याच्या उद्देशाने अशा तपासण्या केल्या जात होत्या. अशा विविध पाहण्यांचे अकरा तपासणी अहवाल प्रकाशित झाले आहेत. ठरावीक कालावधीनंतर पुन्हा पुन्हा होणाऱ्या या तपासण्या आणि त्यातून समोर येणाऱ्या समस्यांवर उपाययोजना काढून वेळोवेळी केलेल्या सुधारणात्मक बदलांमुळे संस्थानातील शिक्षणस्थितीमध्ये प्रगती होऊ लागली.

## प्राथमिक शिक्षण परिषदा

सक्तीच्या प्राथमिक शिक्षणातील अडचणी जाणून घेऊन त्यानुसार योग्य बदल आणि सुधारणा करण्यासाठी सयाजीराव शिक्षण विभागातील प्रमुख अधिकाऱ्यांच्या परिषदांचे आयोजन करत असत. सयाजीरावांनी ऑक्टोबर १९२८ मध्ये शिक्षण आयुक्तांना एक आदेश दिला होता. त्यात म्हटले होते की, 'राज्यातील प्राथमिक शिक्षणातील एक गंभीर त्रुटी म्हणजे या स्तरावरील शिक्षणासाठी केले जाणारे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर वाया जात आहेत. ग्रामीण भागातील शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर बालके प्राथमिक शाळेत प्रवेशित केल्या जातात, मात्र त्याच वर्गांमध्ये ते बराच काळ राहतात. एकाच वर्गात चार-पाच वर्षे राहिल्यावर ते शाळा सोडून देतात. त्यामुळे त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होऊ शकत नाही. अशा रीतीने या विद्यार्थ्यांवर खर्च होणारा पैसा वाया जात आहे.'

प्राथमिक शिक्षणातील हा अडथळा कशामुळे निर्माण होत आहे याची कारणे शोधण्याच्या सूचना शिक्षण आयुक्तांना देण्यात आल्या. या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी शिक्षणमंत्र्यांनी ६ मे १९२९ ला एक शिक्षण परिषद आयोजित केली. प्राथमिक शिक्षणातील या समस्येचा अभ्यास केल्यावर असे लक्षात आले की, जास्त शिक्षक असणाऱ्या शाळांपेक्षा एक किंवा दोन शिक्षकी शाळांमध्ये फारशी गुणवत्ता दिसून येत नाही.

एक शिक्षकी शाळेतील शिक्षकांवर कोणाचे नियंत्रण नसते. जरी तो शिक्षक उत्साही आणि सक्षम असला तरी एक शिक्षक शाळेतील सर्व वर्गांवर पुरेसे लक्ष देऊ शकत नाही. तो जर रजेवर गेला, तर काही काळासाठी ती शाळा बंदच राहते. त्यामुळे अशा शाळा जवळच्या शाळेत एकत्रित कराव्यात असे या परिषदेने सुचविले. या परिषदेच्या अहवालानुसार सयाजीरावांनी जुलै १९२९ मध्ये एक शिक्षकी शाळेच्या परिसरातील शाळेशी एकत्रीकरण करण्याचा आदेश दिला. तरीही ३१५ शाळा या एकशिक्षकी राहिल्याने अशा शाळांमध्ये अतिरिक्त शिक्षक नेमण्यात आले. त्यामुळे राज्यात एकही एकशिक्षकी शाळा राहिली नाही. त्याचप्रमाणे इयत्ता पाचवी आणि सहावीचे वर्गही प्राथमिक शाळांना जोडण्यास येऊ लागले.

पुढच्याच वर्षी म्हणजे २ मे १९३० ला बडोद्याच्या शिक्षणमंत्र्यांनी संस्थानच्या शिक्षण विभागातील सर्व प्रमुख

अधिकाऱ्यांची परिषद आयोजित केली. या परिषदेत सक्तीच्या वयोगटातील मुलांच्या अपूर्ण यादीबाबत चर्चा करण्यात आली आणि त्या संदर्भाने काही सुधारणाही सुचविण्यात आल्या :

१) पुढील वर्षी सन १९३१ मध्ये होणाऱ्या जनगणनेच्या विस्तृत अहवालाची प्रत राज्यातील सर्व शिक्षकांना पुरविण्यात यावी. यातील प्रत्येक घरातील वय वर्ष ५ ते १५ मधील प्रत्येक बालकावर लक्ष केंद्रित करावे. जनगणना आयुक्तांशी समन्वय साधून हा विषय हाताळावा.

२) वार्षिक परीक्षा संपल्यावर लगेचच शाळेत जाणाऱ्या वयाच्या बालकांची यादी तयार करावी.

३) पटेल आणि तलाठी यांना पूर्वी हे काम सोपविण्यात आले होते. त्यांनी तयार केलेल्या यादीत काही त्रुटी आढळून येत असेल किंवा ती यादी अपूर्ण असेल, तर शिक्षकांनी उर्वरित बालकांची पुरवणी यादी तयार करावी.

४) ज्या शिक्षकांचे रेकॉर्ड समाधानकारक आहे अशा शिक्षकांसाठी द्यावयाच्या बोनसची रक्कम वाढवून ती ५०० रु. करण्यात यावी.

५) जे शिक्षक अप्रशिक्षित असतील, मात्र ते आपल्या कामात सातत्याने उत्तम कामगिरी बजावत असतील, अशा शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यात यावी.

६) ज्या शिक्षकांच्या कामात सातत्य आहे, अशा शिक्षकांना टप्प्याटप्प्याने पदोन्नती देण्यात यावी.

७) वर्षानुवर्षे असमाधानकारक कामगिरी करणाऱ्या शिक्षकांची सेवा थांबविण्यात यावी.

८) पूर्व प्राथमिक वर्ग आणि पहिलीच्या वर्गावर शक्यतो प्रशिक्षित शिक्षकाचीच नियुक्ती करण्यात यावी.

## प्राथमिक शिक्षणावरील खर्च

बडोदा संस्थानातील सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणाचा खर्च प्रतिवर्षी बारा ते पंधरा लाख इतका होता. तर प्रतिव्यक्ती सात आणा इतकी रक्कम शिक्षणावर खर्च केली जात असे, त्याचवेळी ब्रिटिश भारतातील हे प्रमाण एक आणा इतके होते. म्हणजे ब्रिटिश भारताच्या ६ पट अधिक रक्कम एका व्यक्तीच्या शिक्षणावर बडोदा संस्थानात खर्च केली जात होती. याबरोबरच अस्पृश्य विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षणासाठी १९३०-३१ ते १९३९-४० या दहा वर्षाच्या कलावधीत सयाजीरावांनी १५,६०० रुपये शिष्यवृतीच्या स्वरूपात दिले. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ३० कोटी २ लाख ७३ हजार ५५२ रुपये इतकी भरते.

## सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्याचे यश

प्राथमिक शिक्षण सक्तीचे केल्यापासून सयाजीरावांनी त्यात अनेक सुधारणा घडवून आणत समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. सयाजीरावांच्या या प्रयत्नांचाच परिपाक म्हणून १९३५ ला संस्थानातील २,४७,६८६ मुलांनी शाळेत प्रवेश घेतला होता. हे प्रमाण शाळेत

जाण्यायोग्य वय असणाऱ्या एकूण बालकांपैकी ७४.८% इतके होते. त्याचवेळी संस्थानातील प्रशिक्षित शिक्षकांची एकूण संख्या ४,६०० होती, त्यापैकी ४,१०० शिक्षक व ५०० शिक्षिका होत्या. तर अप्रशिक्षित शिक्षकांचे प्रमाण १,६२५ इतके असून १,५६९ शिक्षक व ५६ शिक्षिका होत्या. सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्याला मिळालेले लक्षणीय यश सयाजीरावांचे केवळ कागदावरच कायदे न करता कायद्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे यशस्वी धोरण अधोरेखित करते.

## शाहू महाराजांचे जीवन ध्येय

महात्मा फुले यांनी १८८२ मध्ये हंटर आयोगासमोर सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणाची क्रांतिकारक मागणी केली होती. फुले ज्यावेळेला इंग्रज सरकारकडे ही मागणी करत होते त्यावेळी सयाजीरावांनी फुल्यांच्या पुढे जाऊन शिक्षणाबरोबर मोफत निवासाची तरतूदही केली. त्यामुळेच भारतीय समाजक्रांतीचे जनक असणाऱ्या महात्मा फुलेंनी आपला आदर्श म्हणून सयाजीरावांचा फोटो आपल्या बैठकीच्या खोलीत लावला होता. तर २० सप्टेंबर १९१७ ला सयाजीरावांना लिहिलेल्या पत्रात शाहू महाराज त्यांच्या प्राथमिक शिक्षणाच्या कामाची प्रेरणा सयाजीराव महाराज असल्याचे सांगतात. या पत्रात शाहू महाराज म्हणतात, “तुमचे प्राथमिक शिक्षणाचे कार्य मी माझे जीवन ध्येय म्हणून स्वीकारत असून याबाबत मी आपल्या पावलावर पाऊल टाकून वाटचाल करण्याचा निर्धार

केला आहे.” यानंतर १९१९ ला शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण कायदा केला. परंतु दुर्दैवाने आर्थिक व अन्य काही अडचणींमुळे राजर्षी शाहूंना हा कायदा केवळ मुलांपुरताच मर्यादित ठेवावा लागला.

शाहू महाराजांनी २८ जानेवारी १९१९ ला आदेश काढून अस्पृश्य विद्यार्थांना मोफत पुस्तके, पाट्या, पेन्सिल, इ. अभ्यास साहित्य पुरवण्याचा हुकूम केला व त्यासाठी २,५०० रु मंजूर केले. याबाबत शाहू महाराजांसमोर बडोद्याचा आदर्श होता. कारण याआधी ३७ वर्षे म्हणजे १८८२ मध्ये सयाजीरावांनी बडोदा संस्थानात ही योजना राबविली होती. १९१९ मध्येच पुण्यातदेखील मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्यासाठी जनआंदोलन तीव्र झाले होते. या आंदोलनात विठ्ठल रामजी शिंदे अग्रेसर होते. पुढे शिंदेंनी दक्षिण महाराष्ट्रात दौरा करून या आंदोलनाचा प्रसार केला. सातारा जिल्ह्यात या आंदोलनाचे नेतृत्व कर्मवीर अण्णा करत होते. सयाजीरावांनी १८८२ पासूनच या दृष्टीने काम सुरू केले होते व १९०६ मध्ये कोणत्याही आंदोलनाशिवाय हा कायदा बडोदा राज्यात केला होता. महर्षी शिंदे यांना महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणासाठीच्या आंदोलनात सहभागी होण्याची प्रेरणा सयाजीरावांच्या या कायद्याने व त्याच्या अंमलबजावणीने दिली होती असे दिसते. महर्षी शिंदेंचे हे आंदोलन यशस्वी होऊन मुंबई प्रांतात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास झाला. परंतु दुर्दैवाने त्यावेळी तो लागू झाला नाही.

## भारतातील सर्वात क्रांतिकारक कायदा

१०४ वर्षापूर्वीचा बडोद्यातील हा कायदा किती क्रांतिकारक होता याचा अलीकडच्या राज्यकर्त्यांना आलेला क्रांतिकारक अनुभव येथे मांडणे सुखद धक्का देणारे ठरेल. सध्याचे भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना द्वारकेतील एका स्थानिक कार्यक्रमात बोलत होते. तेव्हा तेथे हजर असणाऱ्या स्त्रियांपैकी 'किती स्त्रिया साक्षर आहेत?' असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. त्यावेळी ७० वर्षापुढील वय असणाऱ्या बहुतांश स्त्रियांनी हात वर केले. या तुलनेत हात वर करणाऱ्या तरुणींची संख्या अत्यल्प होती. खरेतर ही खेदाची बाब आहे; परंतु या दृश्याचे खरे गमक हे १०४ वर्षापूर्वी सयाजीराव महाराजांनी यशस्वीरीत्या राबविलेल्या सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षण कायद्यात दडलेले आहे.

राजेशाही असताना सयाजीरावांनी १९०६ ला आपल्या संस्थानात मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण कायदा लागू केला तर स्वतंत्र भारतात हा कायदा अस्तित्वात येण्यासाठी २०१० हे वर्ष उजाडावे लागले. लोकशाही भारतात हा कायदा लागू होण्याअगोदर तब्बल १०४ वर्षे बडोद्यात या कायद्याची अंमलबजावणी यशस्वीरीत्या सुरू होती. यावरून आपल्याला सयाजीरावांच्या दूरदृष्टीची प्रचिती येते. ४ ऑगस्ट २००९ रोजी भारतीय संसदेने संमत केलेला सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा १ एप्रिल २०१० पासून संपूर्ण भारतात लागू

झाला. या कायद्यानुसार भारतातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलामुलींना प्राथमिक शिक्षणाचा अधिकार प्रदान करण्यात आला. २०१० च्या या कायद्याने मूलभूत अधिकारांमध्ये प्राथमिक शिक्षणाच्या हक्काचा समावेश करणारा भारत हा जगातील १३५ देशांपैकी एक देश ठरला. या पार्श्वभूमीवर १०४ वर्षांपूर्वी १९०६ मध्ये आपल्या संस्थानात मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू करणारे सयाजीराव महाराज खऱ्या अर्थाने क्रांतिकारक ठरतात.

६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलामुलींना मोफत प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी या कायद्याने शासनावर सोपविली. परंतु आपल्या पाल्याला शाळेत न पाठवणाऱ्या पालकांना मात्र कोणत्याही शिक्षेची तरतूद या कायद्यात करण्यात आली नाही. याउलट १९०६ मध्ये बडोद्यात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू करताना सयाजीराव महाराजांनी पाल्यांना शाळेत न पाठवणाऱ्या पालकांना दंडाची तरतूद करत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शासन व्यवस्थेइतकेच पालकांनादेखील जबाबदार धरले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ६० वर्षांनी भारतात लागू झालेल्या कायद्यात मात्र अशा प्रकारची कोणतीही तरतूद करणे शक्य झाले नाही. यातच सयाजीरावांच्या धोरणाचे चिरंतरत्व लपलेले आहे.

## शिक्षणाचा अधिकार कायदा - २०१७ आणि बडोद्याचा कायदा

प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याची चर्चा करताना महाराष्ट्र शासनाने २०१७ मध्ये घेतलेल्या एका निर्णयाची चर्चा करणे क्रमप्राप्त ठरते. २०१७ मध्ये महाराष्ट्र शासनाने २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या दुर्गम भागातील शाळा बंद करून त्या जवळच्या शाळांमध्ये विलीन करण्याचा निर्णय घेतला. शासनाच्या या निर्णयामुळे बंद होणाऱ्या बहुतांश शाळा या दुर्गम भागातील होत्या. दैनंदिन जीवनातील अडचणींशी संघर्ष करत शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांवर शासनाने लादलेली ही शाळा बंदी अन्यायकारक होती. याउलट सयाजीराव महाराजांनी दुर्गम भागातील एक शिक्षकी शाळा जवळच्या शाळेत विलीन किंवा त्या शाळांवर अतिरिक्त शिक्षकांची नेमणूक करण्यावर भर दिला. सयाजीरावांनी विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाचा विचार करत योग्य ती सूट देतानाच संस्थानातील प्रत्येक विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात येईल याची काळजी घेतली.

दुर्गम भागात शासनाने लागू केलेली शाळा बंदी ही त्या भागातील विद्यार्थ्यांच्या सारासार विकासाला खीळ घालणारी होती. याबाबतीतही सयाजीरावांचा प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा विचार वरचढ ठरतो. प्राथमिक शिक्षणाचा कायदा करत असताना लोकांना साक्षर करणे एवढा शुद्र उद्देश

महाराजांनी ठेवला नव्हता. तर साक्षरता ही ज्ञानसक्षम होण्याची पूर्वअट म्हणून महाराजांनी स्वीकारली होती.

सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्याने साक्षरता वाढली परंतु सयाजीरावांना त्यांच्या प्रजेला फक्त साक्षर करायचे नव्हते तर ज्ञानी करायचे होते. त्यामुळे या कायद्याच्या अंमलबजावणी पाठोपाठ सयाजीरावांनी साक्षर प्रजेला ज्ञानमार्गी करण्याच्या उद्देशाने गाव तेथे ग्रंथालय ही चळवळ गतिमान केली. त्यामुळे भारतातील शिक्षण प्रसाराच्या चळवळीला ग्रंथालय चळवळीची जोड देण्याचा सयाजीरावांचा हा प्रयत्न आजही क्रांतिकारक ठरतो. कारण शिक्षण प्रसाराचा एवढा मूलभूत विचार प्रत्यक्ष राबविण्याचा प्रयत्न करणारे सयाजीराव हे खऱ्या अर्थाने तत्त्वज्ञ राजे होते याची साक्ष पटते. त्यासाठी सयाजीरावांनी डॉ. बॉर्डन या ग्रंथालयशास्त्राच्या जगातील अव्वल तज्ज्ञाला १९१० मध्ये बडोद्यात आणले. बॉर्डनच्या नेतृत्वाखाली महाराजांनी बडोद्यात जी ग्रंथालय चळवळ रुजवली तिला भारताच्या इतिहासात तोड नाही. महिलांना पत्र्याच्या पेटीतून घरपोच पुस्तके, तुरुंग, स्मशानभूमी, रुग्णालये इ. ठिकाणी ग्रंथालये हे उपक्रम आजही नावीन्यपूर्ण ठरतात. महाराजांच्या या अभियानाएवढे समाजाच्या लोकशाहीकरणाचे उत्तम उदाहरण जगाच्या इतिहासात दुसरे आढळणे अशक्य आहे. 'साक्षर राक्षस' तयार होऊ नयेत याची सयाजीरावांनी जेवढी काळजी घेतली तेवढी आजअखेर भारतात घेतली गेली नाही.

ज्ञानाच्या लोकशाहीकरणाशिवाय सामाजिक आणि राजकीय लोकशाही अस्तित्वात येऊ शकत नाही. या पार्श्वभूमीवर १९०६ चा हा कायदा भारतीय समाजाच्या लोकशाहीकरणाच्या दिशेने उचललेले भारतातील सर्वात क्रांतिकारक पाऊल होते.

भारतात शिक्षणाचा अधिकार कायदा २०१० मध्ये करण्यात आला. या अगोदर १०४ वर्षे म्हणजेच १९०६ मध्ये सयाजीराव महाराजांनी सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. हा कायदा करण्यामागे असणारा महाराजांचा उद्देश, कायद्याच्या अंमलबजावणीची पद्धत, त्यासाठीची आर्थिक तरतूद आणि अत्यंत प्रगत मनुष्यबळ या सर्व तयारीनिशी महाराजांनी केलेले काम आज विश्वास बसणार नाही असे आहे. कारण २०१० च्या भारतातील शिक्षण अधिकार कायद्याची गेल्या १० वर्षातील स्थिती आणि प्रगती विचारात घेता महाराजांचे १०४ वर्षापूर्वीचे काम पुढच्या १०० वर्षानंतरचे वाटावे इतके आदर्श होते. म्हणूनच महाराजांच्या शिक्षणविषयक धोरणाचे पुनर्चिंतन करणे गरजेचे ठरते. कारण त्याशिवाय आज आपल्यासमोर असणारे शैक्षणिक प्रश्न आणि नवी आव्हाने पेलण्यासाठी आपण सक्षम होणार नाही.

नुकतेच भारताचे राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० जाहीर झाले आहे. या धोरणावर सध्या उलट सुलट चर्चासुद्धा सुरू आहे. या धोरणातील प्राथमिक शिक्षणासंदर्भातील तरतुदींची तुलना बडोद्यातील या प्राथमिक शिक्षण धोरणाशी करणे अधिक

समर्पक ठरेल. कारण २०२० च्या या शिक्षण धोरणातील तरतुदींच्या पुढे जाणारा कृतीकार्यक्रम महाराजांनी ११० वर्षापूर्वी बडोद्यात यशस्वीपणे राबविला होता. २०२० च्या धोरणातील पुढील तरतुदी सयाजीरावांच्या कृतिकार्यक्रमाची आठवण करून देणाऱ्या आहेत. १) मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करताना पालकांच्या दैनंदिन गरजा आणि व्यावहारिक अडचणी विचारात घेतल्याचे जाणवत नाही. केवळ निश्चित केलेल्या उद्दिष्टाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करण्याचा अट्टाहास जाणवतो. २) मुलांबरोबरच समाजातील इतर घटकांचे वाचन वाढावे यासाठी शाळेच्या कामकाजाव्यतिरिक्त इतर वेळात शालेय ग्रंथालयाचा उपयोग करता यावा या दृष्टीने ग्रामीण भागात शालेय ग्रंथालयांची स्थापना करण्याचा सरकारचा मनोदय आहे. ३) लोकांची वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये बुक क्लबच्या स्थापणेस प्रोत्साहन देणार. ४) लोकांना पुस्तके व्यापक प्रमाणावर उपलब्ध व्हावीत यासाठी National Book Promotion Policy तयार केली जाणार आहे.

या तरतुदींची तुलना बडोद्यातील प्राथमिक शिक्षणासंदर्भातील आपल्या वरील चर्चेशी केली असता. या धोरणात केलेल्या तरतुदींपेक्षाही अधिक व्यापक आणि रचनात्मक काम महाराजांनी बडोद्यात यशस्वी केले होते असे लक्षात येते. २०१० चा शिक्षण अधिकार कायदा असो

किंवा २०२० चे नवे शैक्षणिक धोरण असो सयाजीरावांचे काम आजही तितकेच समकालीन आणि मार्गदर्शक असल्याचे सिद्ध होते. यातच सयाजीरावांच्या पुनर्वाचनाची आपली गरज अधोरेखित होते.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक ‘क्रांतीपर्व’ - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके - धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू - धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन - सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी - दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन) - डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर - सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस - पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र - बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत - बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :

**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि.,११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com